**किरकोळ फौजदारी अर्ज क्र. ०१/२०१८ मध्ये निशाणी क्र. १ वर आदेश**

१) प्रस्तुतचा अर्ज अर्जदार चौधरी यात्रा कंपनी प्रा. लि. तर्फे संचालक श्री. सत्यनारायण रामनिवास चौधरी यांनी सामनेवाला क्र. १ ते ३ विरुध्द सामनेवाला यांनी अटकाव करुन ठेवलेले वाहन बस क्र. एमएच-१५-एके-११८८ हे अर्जदाराच्या कब्जामध्ये परत मिळण्यासाठी व तसेच सामनेवाला यांनी तपासणी प्रतिवेदन क्र. ९०६७८६ प्रमाणे वाहन बस क्र. एमएच-१५-एके-११८८ या वाहनाची केस न्यायालयात पाठविण्याचा आदेश होण्याबाबत दाखल केला आहे.

२) अर्जदाराच्या प्रस्तुत अर्जातील कथनानुसार अर्जदार हे यात्रा कंपनीचा व्यवसाय करत असतात व त्यासाठी आवश्यक असलेले बस वाहन बाळगतात. अर्जदार यांच्या मालकीची एमएच-१५-एके-११८८ या क्रमांकाची बस आहे. अर्जदाराला ज्यावेळी वाहन उपयोग करायचे नसते किंवा नादुरुस्त असते किंवा इतर कारणासाठी त्याचा वापर करायचा नसतो त्यावेळी अर्जदार हे त्यांना असलेल्या कायदेशीर अधिकाराप्रमाणे सदर वाहन त्यांच्या स्वमालकीच्या किंवा योग्य, संयुक्तिक जागेवर वा दुरुस्तीच्या ठिकाणी पार्क करुन ठेवतात व सदर वाहनाचे नॉनयुज दिलेले असते. अर्जदाराने सदर वाहन क्र. एमएच-१५-एके-११८८ हे दि. ३०/११/२०१७ रोजी नॉनयुज करुन घेतले होते.

३) अर्जदाराच्या कथनानुसार अर्जदाराने नॉनयुज करुन घेतलेली बस क्र. एमएच-१५-एके-११८८ ही सामनेवाला यांनी तपासणी प्रतिवेदन क्र. ९०६७८६ अन्वये मोटार वाहन कायदा कलम २०७ प्रमाणे प्रादेशिक परिवहन कार्यालय, नाशिक येथे अटकाव करुन त्यांच्या कार्यालयात ठेवली आहे. अर्जदाराने सामनेवाला यांना केस त्वरीत न्यायालयात पाठवावी अशी अनेक वेळा तोंडी विनंती केली. त्यानंतर अर्जदाराने सामनेवाला यांना दि. १८/१२/२०१७, दि. २०/१२/२०१७,

दि. २१/१२/२०१७ व दि. १०/०१/२०१८ रोजी केस न्यायालयात पाठविण्याबाबत पत्र दिले. सामनेवाला यांनी सदरची केस कोर्टात पाठविण्यास नकार दिलेला आहे. सामनेवाला यांनी दि. २६/१२/२०१७ रोजीचे बेकायदेशीर पत्र दिलेले आहे.

४) अर्जदाराच्या कथनानुसार सदर अर्जातील नमूद वाहन हे अर्जदाराचे व्यवसायाचे, उपजिविकेचे साधन असल्यामुळे व तसेच मोठी गुंतवणूक असल्याने त्याचा परिणाम अर्जदाराच्या धंदा व्यापारावर होतो. शेवटी अर्जदाराने प्रस्तुत अर्जामध्ये अशी विनंती केली आहे की, सामनेवाला यांनी विनाविलंब व तातडीने तपासणी प्रतिवेदन क्र. ९०६७८६ प्रमाणे वाहन क्र. एमएच-१५-एके-११८८ या वाहनाची केस तातडीने न्यायालयात पाठवावी. तसेच अर्जदार यांनी पुढे अशी विनंती केली आहे की, वाहन क्र. एमएच-१५-एके-११८८ ही त्वरीत व विनाविलंब अर्जदाराच्या कब्जामध्ये परत करण्याचा हुकूम अर्जदाराच्या लाभात व्हावा.

५) या अर्जातील सामनेवाला क्र. ३ श्री. संकेत मा. गायकवाड, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक यांनी अर्जदार चौधरी यात्रा कंपनी प्रा.लि. यांना तपासणी प्रतिवेदन क्र. ९०६७८६ हा देवून बस क्र. एमएच-१५-एके-११८८ ही बस मोटार वाहन कायदा कलम २०७ नुसार प्रादेशिक परिवहन कार्यालय, नाशिक येथे अटकाव करुन ठेवली असल्याने व तसेच अर्जदाराने सदर तपासणी प्रतिवेदनाप्रमाणे न्यायालयात केस पाठविण्याबाबत प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना पत्र दिले असता सदर पत्रास श्री. राहुल कदम, सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी, नाशिक यांनी अर्जदारास सदर वाहनावरील केसबाबत पुढील कार्यवाही संदर्भात लेखी पत्र दिले असल्याने सामनेवाला क्र.२ श्री. राहुल कदम, सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन कार्यालय, नाशिक व सामनेवाला क्र. ३ श्री. संकेत मा. गायकवाड, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक, प्रादेशिक परिवहन कार्यालय, नाशिक

यांना प्रस्तुत किरकोळ फौजदारी अर्जास त्यांचे म्हणणे/जबाब दाखल करण्यासाठी नोटीस काढण्यात आली आहे. तसेच प्रस्तुत किरकोळ फौजदारी अर्जास सरकारी वकिलांचे म्हणणे घेण्यात आले आहे. प्रस्तुत किरकोळ फौजदारी अर्जाची सामनेवाला क्र. १ प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन कार्यालय, नाशिक यांना नोटीस काढण्याची आवश्यकता नसल्याने सामनेवाला क्र. १ यांना नोटीस काढण्यात आलेली नाही.

६) सामनेवाला क्र. २ व ३ यांना प्रस्तुत किरकोळ फौजदारी अर्जाची नोटीस काढण्यात आल्यानंतर सामनेवाला क्र. २ व ३ यांनी या कामी न्यायालयात हजर राहुन त्यांचे जबाब दाखल केले आहेत. सामनेवाला क्र. २ श्री. राहुल कदम, सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन कार्यालय, नाशिक यांनी निशाणी क्र. ८ कडे व त्यानंतर निशाणी क्र. ११ कडे असे दोन जबाब दाखल केले आहेत. तसेच सामनेवाला क्र. ३ श्री. संकेत गायकवाड, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक, प्रादेशिक परिवहन कार्यालय, नाशिक यांनी निशाणी क्र. ९ कडे व त्यानंतर निशाणी क्र. १२ कडे असे दोन जबाब दाखल केले आहेत. तसेच सहाय्यक मोटार वाहन अभियोक्ता यांनी निशाणी क्र. १० कडे त्यांचे म्हणणे दाखल केले आहे.

७) सामनेवाला क्र. ३ श्री. संकेत गायकवाड, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक यांनी त्यांच्या निशाणी क्र. ९ व १२ कडील जबाबामध्ये असे कथन केले आहे की, चौधरी यात्रा कंपनी यांनी वाहन क्र. एमएच-१५-एके-११८८ यासाठी ना-वापर अर्ज आवक क्र. ५६०५, दि. ३०/११/२०१७ रोजी कार्यालयात सादर केला आहे. दि. १७/१२/२०१७ रोजी ते कार्यालयीन कामकाजास्तव जात असताना त्यांना पेठ नाका, नाशिक येथे सदर वाहन क्र. एमएच-१५-एके-११८८ हे सार्वजनिक रस्त्यावर व्यवसायाकरीता उभे असलेले आढळुन आले. सदर वाहन चालकाकडे चौकशी केली असता सदर वाहन हे नाशिक

दर्शनाच्या प्रवाशांकरीता उभे आहे असे सांगण्यात आले म्हणुन सदर वाहनास प्रतिवेदन क्र. ९०६७८६ देण्यात येवून मोटार वाहन कायदा, १९८८ चे कलम २०७ प्रमाणे प्रादेशिक परिवहन कार्यालय, नाशिक येथे अटकावुन ठेवण्यात आले.

८) सामनेवाला क्र. २ श्री. राहुल कदम, सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी त्यांच्या निशाणी क्र. ८ व ११ कडील जबाबामध्ये असे कथन केले आहे की, कर अधिकारी श्री. डगळे, सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी वाहन मालकास वाहन क्र. एमएच-१५एके-११८८ करीता कार्यालयाचे जावक क्र. ५७०३/ परिवहन/प्रापका/नाशिक/२०१७, दि. २१/१२/२०१७ व जावक क्र. ५७६३/ प्रापका/नाशिक/२०१७, दि. ३०/१२/२०१७ नुसार वाहन ना-वापराच्या कालावधीत सार्वजनिक ठिकाणी आढळुन आल्यामुळे ना-वापर परवाना रद्द करण्याबाबत व ना-वापरातील कालावधीतील कर भरण्याबाबत नोटीस बजावण्यात आली आहे. सदर जबाबामध्ये पुढे असे कथन केले आहे की, त्यांच्या कार्यालयाचे जावक क्र. ५७३४/ खटला/प्रापका/नाशिक/२०१७, दि. २६/१२/२०१७ व जावक क्र. १०७३/खटला/प्रापका/नाशिक/२०१८, दि. ०३/०३/२०१८ नुसार वाहन मालकास वाहनावरील ना-वापर कालावधीत सार्वजनिक रस्त्यावर वापर करताना आढळुन आल्यामुळे देण्यात आलेल्या जावक क्र.५७०६/प्रापका/नाशिक/२०१७, दि. २१/१२/२०१७ च्या नोटीसनुसार कर भरल्यानंतरच वाहनाबाबतची केस निर्धारीत मुदतीमध्ये न्यायालयात पाठविण्यात येईल असे पत्र देण्यात आले आहे. सदर म्हणण्यामध्ये शेवटी अशी विनंती केली आहे की, वाहनाचा थकीत कर भरल्यानंतरच वाहन मुक्त करण्यात यावे.

९) सहाय्यक मोटार वाहन अभियोक्ता यांनी त्यांच्या निशाणी क्र. १० कडील म्हणण्यामध्ये असे कथन केले आहे की, वाहनाचा ना-वापर कालावधीतील कर थकीत असल्यामुळे सदर वाहनाची केस

न्यायालयात पाठविण्यात आलेली नाही. वाहन मालकाकडुन वाहन सोडविण्यासाठी वाहनाचा कर भरलेला नाही. सदर अटकावुन ठेवलेल्या वाहनाचा कर भरेपर्यंत अटकावुन ठेवण्याची कार्यवाही बी.एम.व्ही. टॅक्स ॲक्ट कलम १२(बी) अन्वये केली जाते. कार्यालयीन अभिलेखाप्रमाणे वाहनाचे योग्यता प्रमाणपत्रदेखील संपलेले असल्याने सार्वजनिक सुरक्षेसाठी व कर न भरण्याच्या कारणावरुन वाहन अटकावले आहे.

१०) प्रस्तुत किरकोळ फौजदारी अर्जाच्या कामी मी अर्जदारातर्फे विद्वान वकील श्री. ए. सी. जैन व सामनेवाला यांच्यातर्फे विद्वान सहाय्यक मोटार वाहन अभियोक्ता श्री. एस. जी. आहेर यांचा युक्तिवाद ऐकला. मी अभिलेखावरील सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले.

११) अर्जदाराच्या विद्वान वकिलांनी असा युक्तिवाद केला की, अर्जदाराने प्रस्तुत अर्जातील नमूद वाहन क्र. एमएच-१५-एके-११८८ हे नॉनयुज करुन घेतले असताना व तसे ना-वापराबाबतचे घोषणापत्र प्रादेशिक परिवहन कार्यालय, नाशिक येथे सादर केले असताना सामनेवाला याने अर्जदाराचे वाहन अटकाव करुन ठेवले आहे व तसेच महाराष्ट्र मोटार व्हेईकल्स् टॅक्स ॲक्ट मधील कलम १२(बी) व १८(ए) प्रमाणे वाहन जप्तीची कार्यवाही केली नाही व तसेच प्रस्तुत अर्जातील नमूद वाहनाचा कर जमा केलेला आहे व त्यामुळे सदर वाहन अर्जदाराच्या ताब्यात परत देण्याबाबत आदेश व्हावा.

१२) विद्वान सहाय्यक मोटार वाहन अभियोक्ता यांनी असा युक्तिवाद केला की, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक यांना टॅक्स ॲक्ट कलम १२(बी) प्रमाणे वाहन अटकावुन ठेवण्याचे अधिकार आहेत. सदर वाहनाचा टॅक्स थकला आहे व तसेच अर्जदाराला टॅक्स भरण्यासाठी नोटीस दिली आहे व तसेच मोटार वाहन कायदा कलम २०७ प्रमाणे जप्त केलेले वाहन सोडण्याचा या कोर्टाला अधिकार नाही व त्यामुळे अर्ज नामंजूर करावा.

१३) प्रस्तुत किरकोळ फौजदारी अर्जाच्या कामी सामनेवाला हे

"Faiyaz Vs. The State of U.P., Petition No. 4478 of 2010" या आदरणीय अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या न्यायनिवाडयावर विसंबुन राहिले आहे. उपरोक्त न्यायनिवाडयामध्ये आदरणीय अलाहाबाद उच्च न्यायालयाने असे मत व्यक्त केले आहे की,

"I am of the view that the application moved by the petitioner for release of the vehicle which was seized by the Assistant Transport Officer was not maintainable before the Learned Chief Judicial Magistrate, which has rightly been rejected by him."

१४) प्रस्तुत किरकोळ फौजदारी अर्जाच्या कामी सामनेवाला हे "Ashok Kumar Singh Vs. The Union of India & Ors., Criminal Writ No. 719 of 1999" या आदरणीय पटना उच्च न्यायालयाच्या न्यायनिवाडयावर विसंबुन राहिले आहे. उपरोक्त न्यायनिवाडयामध्ये आदरणीय पटणा उच्च न्यायालयाने असे मत व्यक्त केले आहे की,

"So far the jurisdiction conferred upon the Magistrate under Section 457 of the Cr.P.C. is concerned, it cannot be exercised in respect of vehicles, which has been seized under Section 207 of the Motor Vehicles Act, as a special provision has been made for this under the special Act. Any provision made under the Special Act will have to be exercised by same authority, which has specially been authorized following the same procedure, as provided under the Act."

१५) प्रस्तुत किरकोळ फौजदारी अर्जाच्या कामी सामनेवाला हे "State of Rajasthan & Anr. Vs. Narendra Paliwal & Anr., S.B. CR. REVISION PETITION NO. 324/1994" या आदरणीय राजस्थान उच्च न्यायालयाच्या न्यायनिवाडयावर विसंबुन राहिले आहे. उपरोक्त न्यायनिवाडयामध्ये आदरणीय राजस्थान उच्च न्यायालयाने असे मत व्यक्त केले आहे की,

"When tax was due and the vehicle was seized by the authorities of the transport department, the power vests under Section 207(2) of M. V. Act before the Transport Authorities and the Magistrate has no jurisdiction to release the vehicle under Section 457 of Cr.P.C."

१६) प्रस्तुत किरकोळ फौजदारी अर्जाच्या कामी सामनेवाला हे

"P.Umamaheswari Vs. The Motor Vehicle Inspector & Anr., W. P. No. 24115 of 2017 and W. M. P. No. 25461 of 2017" या आदरणीय मद्रास उच्च न्यायालयाच्या न्यायनिवाडयावर विसंबुन राहिले आहे. उपरोक्त न्यायनिवाडयामध्ये आदरणीय मद्रास उच्च न्यायालयाने सदर प्रकरणातील रिस्पॉंडंट मोटार व्हेईकल इन्स्पेक्टर व रिजनल ट्रान्स्पोर्ट ऑफिसर यांना अर्जदाराचे वाहन हे अर्जदाराला परत करण्याबाबत आदेशीत केले आहे.

१७) प्रस्तुत किरकोळ फौजदारी अर्जाच्या कामी अर्जदार हे "P. P. Dave Vs. State of Gujarat" या आदरणीय गुजराथ उच्च न्यायालयाच्या न्यायनिवाडयावर विसंबुन राहिला आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या सदर न्यायनिवाडयाच्या प्रतीमध्ये प्रकरण क्रमांक किंवा जरनलचे नाव नमूद नाही. उपरोक्त न्यायनिवाडयामध्ये आदरणीय गुजराथ उच्च न्यायालयाने असे मत व्यक्त केले आहे की,

"The Judicial Magistrate has all the powers and jurisdiction to release the vehicles in the criminal complaints and cases pending before him and not otherwise."

१८) प्रस्तुत किरकोळ फौजदारी अर्जाच्या कामी अर्जदार हे "Sreenath Travel Agency And Anr. Vs. Lt. Governer of Delhi And Ors., AIR 2004 Delhi 1" या आदरणीय दिल्ली उच्च न्यायालयाच्या न्यायनिवाडयावर विसंबुन राहिले आहे. उपरोक्त न्यायनिवाडयामध्ये आदरणीय दिल्ली उच्च न्यायालयाने असे मत व्यक्त केले आहे की,

"Till rules prescribing the manner of seizure and detention of vehicles under section 207(1) of the said Act are made and enforced, no vehicle can be impounded in exercise of the power conferred under this section."

१९) प्रस्तुत किरकोळ फौजदारी अर्जाच्या कामी अर्जदार हे "Balu @ Dinkar Baburao Tambe Vs. State of Maharashtra, Writ Petition No. 8440 of 2012" या आदरणीय मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायनिवाडयावर

विसंबुन राहिला आहे. मी उपरोक्त न्यायनिवाडयाचे वाचन केले. उपरोक्त न्यायनिवाडयामध्ये आदरणीय मुंबई उच्च न्यायालयाने असे मत व्यक्त केले आहे की,

"No doubt, Section 207 of the Motor Vehicles Act are special provisions but even so, a police officer or the person authorized by the State Government under the said enactment shall cease to exercise powers under Section 207 of the Motor Vehicles Act qua the vehicle which is subject matter of criminal case of which cognizance is taken by the Court, consequent to the registration of offence and making the said vehicle as a crime property."

उपरोक्त न्यायनिवाडयामध्ये आदरणीय मुंबई उच्च न्यायालयाने व्यक्त केलेल्या मताच्या अनुषंगाने आपल्या हातातील प्रकरणातील वस्तुस्थिती विचारात घेता असे दिसून येते की, प्रस्तुत प्रकरणी सामनेवाला क्र. ३ यांनी अर्जदाराला दिलेले तपासणी प्रतिवेदन क्र. ९०६७८६, दि. १७/१२/२०१७ नुसारचा खटला/फिर्याद या न्यायालयात अद्यापपावेतो दाखल केलेली नाही.

२०) प्रस्तुत किरकोळ फौजदारी अर्जाच्या कामी अर्जदार हे "Noor Khan Vs. State of Rajasthan, 1 (1998) ACC 362" या आदरणीय राजस्थान उच्च न्यायालयाच्या न्यायनिवाडयावर विसंबुन राहिले आहे. उपरोक्त न्यायनिवाडयामध्ये आदरणीय राजस्थान उच्च न्यायालयाने असे मत व्यक्त केले आहे की,

"In M.V. Act or M.V. Taxation Act, the jurisdiction of Criminal Court to entertain application under Section 457, Cr.P.C. is not ousted. An option, however, has been given to the owner of the vehicle under Section 207(2) of the M. V. Act to make an application for the release of the vehicle before the Transport Authority or any other authorised officer. Intention of Legislature is evident from the language used in Sub-section 2 of Section 207 of the M.V. Act which says–

Where a motor vehicle has been seized and detained under Sub-

section (1) the owner or person incharge of the Motor Vehicle may apply to the transport authority.

Thus owner of the vehicle or person incharge of the vehicle has two options for the release of the vehicle :

(1) He may move an application under Section 457, Cr. P. C. before the Magistrate, or (2) He may request the Transport authority or other authorised person under Section 207(2) M. V. Act."

२१) उपरोक्त नमूद "Noor Khan Vs. State of Rajasthan, 1 (1998) ACC 362" या न्यायनिवाडयामध्ये आदरणीय राजस्थान उच्च न्यायालयाने व्यक्त केलेले मत विचारात घेता माझ्या मते अर्जदाराला त्याचे जप्त वाहन परत मिळण्याबाबत फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४५७ प्रमाणे न्यायदंडाधिकारी यांच्याकडे अर्ज करता येतो. त्यामुळे माझ्या मते प्रस्तुत प्रकरणी अर्जदाराने दाखल केलेल्या अर्जाची सुनावणी घेण्यास या न्यायालयास अधिकारीता आहे. परंतु अर्जदाराने प्रस्तुत अर्जामध्ये केलेल्या विनंत्या मंजूर होण्यास पात्र आहेत किंवा कसे हे पाहणे आवश्यक आहे.

२२) अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसून येते की, महाराष्ट्र मोटार व्हेईकल्स् टॅक्स ॲक्ट मधील कलम १८(ए) मध्ये नमूद केल्याप्रमाणे FORM 'DA' प्रमाणे वाहन जप्त केलेले नाही.

२३) सामनेवाला क्र. ३ श्री. संकेत गायकवाड, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक व सामनेवाला क्र. २ श्री. राहुल कदम, सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन कार्यालय, नाशिक यांच्या जबाबातील कथनानुसार अर्जदाराचे वाहन क्र. एमएच-१५-एके-११८८ हे ना वापराचे वाहन दि. १७/१२/२०१७ रोजी पेठ नाका, नाशिक येथे सार्वजनिक रस्त्यावर व्यवसायाकरीता उभे असलेले आढळुन आल्याने सामनेवाला क्र. ३ सहाय्यक मोटार वाहन निरिक्षक यांनी तपासणी प्रतिवेदन क्र. ९०६७८६ देवून सदर वाहन हे मोटार वाहन कायदा, १९८८ चे कलम २०७ प्रमाणे प्रादेशिक परिवहन

कार्यालय, नाशिक येथे अटकावुन ठेवले आहे. तसेच कर अधिकारी श्री. डगळे, सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी वाहन मालकास वाहन ना-वापराच्या कालावधीत सार्वजनिक ठिकाणी आढळुन आल्यामुळे ना-वापर परवाना रद्द करण्याबाबत व ना-वापरातील कालावधीतील कर भरण्याबाबत नोटीस बजावण्यात आली आहे.

२४) अर्जदाराने या कामी निशाणी क्र. १७ कडील यादीसोबत अनुक्रमांक २ कडे वाहन क्र. एमएच-१५-एके-११८८ या वाहनाचा कर भरल्याच्या पावतीची झेरॉक्स प्रत दाखल केली आहे. सदर कर भरल्याच्या पावतीच्या झेरॉक्स प्रतीचे अवलोकन करता असे दिसून येते की, सदरची कर भरल्याची पावती ही दिनांक ०४/११/२०१६ रोजीची असुन सदर पावतीव्दारे दिनांक ०१/११/२०१६ ते ३१/०१/२०१७ या कालावधीतील कर भरलेला आहे. वर नमूद केल्याप्रमाणे अर्जदाराचे वाहन क्र. एमएच-१५-एके-११८८ हे ना वापराचे वाहन दि. १७/१२/२०१७ रोजी पेठ नाका, नाशिक येथे सार्वजनिक रस्त्यावर व्यवसायाकरीता उभे असलेले आढळुन आले आहे. अर्जदाराने त्यांचे वाहन क्र. एमएच-१५-एके-११८८ या वाहनाचा ना-वापर कालावधीतील म्हणजे दिनांक ०१/१२/२०१७ ते दिनांक ३१/१२/२०१७ या कालावधीतील कर भरल्याबाबतचा पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. तसेच सहाय्यक मोटार वाहन अभियोक्ता यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे कार्यालयीन अभिलेखाप्रमाणे सदर वाहनाचे योग्यता प्रमाणपत्र देखील संपले आहे. अर्जदाराने त्यांचे वाहन क्र. एमएच-१५-एके-११८८ या वाहनाच्या वापराबाबतचा कर भरलेला नसताना व सदर वाहनाचे योग्यता प्रमाणपत्र संपलेले असताना अर्जदाराला सदर वाहन व्यावसायीक वापराकरीता परत करणे संयुक्तीक होणार नाही.

२५) अर्जदाराने प्रस्तुत अर्जामध्ये अशी विनंती केली आहे की, सामनेवाला यांनी विनाविलंब व तातडीने तपासणी प्रतिवेदन

क्र. ९०६७८६ प्रमाणे वाहन क्र. एमएच–१५–एके–११८८ या वाहनाची केस तातडीने न्यायालयात पाठवावी. माझ्या मते फिर्यादी पक्षाने त्यांचा खटला/फिर्याद ही फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४६८ मधील तरतुदीमध्ये नमूद केलेल्या मुदतीमध्ये न्यायालयात दाखल करणे आवश्यक आहे. फिर्यादी पक्षाने त्यांचा खटला/फिर्याद ही मुदतीमध्ये दाखल न केल्यास सदर फिर्याद फेटाळण्यात येते. सामनेवाला यांनी त्यांची केस तातडीने न्यायालयात पाठवावी असे सामनेवाला यांना आदेशीत करण्याबाबतची या न्यायालयास अधिकारीता असल्याची तरतूद अर्जदाराच्या विद्वान वकिलांनी या न्यायालयाच्या निदर्शनास आणुन दिली नाही.

२६) वर केलेली सर्व चर्चा व कारणमिमांसेचा विचार करता माझ्या मते अर्जदाराने दाखल केलेला प्रस्तुतचा किरकोळ फौजदारी अर्ज समर्थनीय नाही व तो नामंजूर होण्यास पात्र आहे. सबब हे न्यायालय न्यायाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**<u>आदेश</u>**

१. प्रस्तुत किरकोळ फौजदारी अर्ज नामंजूर करण्यात येतो.

२. वरीलप्रमाणे न्यायालयात आदेशाचे कथन करून घोषीत करण्यात आला.

सही/–
( पां. लिं. घुले )
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग,
मोटार वाहन न्यायालय, नाशिकरोड.

ठिकाण :– नाशिकरोड.
दिनांक :– १०/०५/२०१८.

## Certificate

I affirm that the contents of this PDF file are same, word to word as per the original.

| | | |
|---|---|---|
| Name of the Court | : | Judicial Magistrate, F.C., Motor Vehicle Court, Nashikroad. |
| Name of the Stenographer | : | Shri. S. S. Bejekar. |
| PDF uploaded on | : | 10/05/2018. |